

# 'तथापि'चा जिव्हाळा

आमच्यासारख्या अडाणी सर्व साथींना नमस्कार.

जिव्हाळ्याच्या या अंकाचं संपादकीय कुठल्या विषयावर लिहावं असा विचार चालू होता. साधारणपणे आपल्या राज्याविषयीच्या, स्त्रिया आणि सर्वच मागास समुहांवर परिणाम करणाऱ्या चालू घडामोडींवर अंकाच्या माध्यमातून काहीतरी भाष्य करण्याकडे आपला कल असतो. कधीतरी क्वचित राष्ट्रीय म्हटल्या जाणाऱ्या घटनांवरही हात सफाई होते. आपली तेवढीच ताकद. या वेळेसही काही वर्षापूर्वी अयोध्येत झालेल्या नाटकाच्या अलाहाबाद खंडपीठ प्रस्तुत उत्तरार्धावर लिहावं असा विचार होता. परंतु नजर उत्तर प्रदेशातून अचानक दिल्लीवर स्थिरावली आणि आम्ही पुरते गोंधळात पडलो. राष्ट्रीय राजधानीच्या परिसरावर प्रचंड धुराळा उडालेला पाहून म्हटलं थोडं खाली जाऊन बघावं. तर लोकांना बोलताना ऐकलं की हा मातीचा धुराळा नसून करोडो रुपयांचा धुराळा आहे. म्हणलं मग थोडं विस्तारातच माहिती घ्यायला पायजेल. असं सांगोवांगी माहितीवर अवलंबून राहून भाष्य करायला आपण गल्लीतले पत्रकार थोडेच आहोत. राष्ट्रीय वृत्तपत्रांप्रमाणे आपणही इंटरनेट, बीबीसीवाल्यांची इनफरमेशन मिळवून छापायला पायजेल. मग काय ह्या त्या वृत्तसंस्था, इथले तिथले सूत्र, हा तो माहितीचा खजिना इ. पासून अंतस्थ म्हणणाऱ्या माहितीगाराकडून माहिती मिळवली. आणि तेव्हापासून आपण दिल्लीच्या धुराळ्याकडे का बघितलं हा एकच प्रश्न डोक्यात घुमतोय.

त्याला कारणही तसंच आहे. मिळालेल्या सर्व माहितीचं विश्लेषण करण्यासाठी आमची आख्खी टीम (म्हणजे आमीच) बसली तेव्हा कळलं कॉमनवेल्थ गेम्स म्हणून जी खेळांची स्पर्धा का काय दिल्लीत झाली तिच्यावर भारत सरकारनं (कॉमन मॅनके साथवालं गव्हर्मेंट) उडवलेल्या करोडोंचा हा धुराळा दिल्लीवर घुमायलाय. पुढे अशीही माहिती हाती आली की आता तोच धुराळा जे कोणी आयोजक होते त्यांच्या नाकातोंडात जाणाराय. आमी म्हटलं आसं कसं होईल? एवढे पैसे खर्च केले आसतील तर आयोजकांनी धुराळ्यानं गुदमरु नये म्हणून साधे *मास्क* विकत घेतले नसतील का काय? पण ज्यच्यानं आमचं डोकं फिरलं तो मुद्दा हा नाहीच. आम्ही मिळविलेल्या एकूण विश्वसनीय माहितीमधून जो आकडा समोर येत होता तो काही डोक्यात घुसायला मागत नव्हता. मिलियन का बिलियनचं रुपांतर रुपयांमध्ये करताना दमछाक झाली ती संपायचं नावच नाही. शेवटी जो आकडा समोर आला तो होता ७० हाजार करोड रुपये.

पहिलं प्रथम सवयीनं वाटलं आपल्या देशातलं दारिद्र्य, गरिबीची आकडेवारी आणि हा खर्चाचा आकडा याची तुलना वाचकांच्या माथी मारावी आणि आपलं ज्ञान दाखवून द्यावं. पण म्हटलं हे आपण नेहमीच करतो. आपल्याकडे पॉजिटिव्ह मेंटॅलिटीच नाही. कॉमन मॅनची काळजी असणारं हे गव्हर्मेंट त्याचीच वेल्थ कॉमनवेल्थ सारख्या खेळांवर खर्च करत असेल तर काय बिघडलं? आज जर आपल्या देशाचं नाव जगातली भावी सुपरपावर म्हणून घेतलं जातंय तर मग खर्च करावाच लागतंय. उगं आसतंय का? एवढे लोकं येणार ते भारतातलं दारिद्र्य बघून थोडंच म्हणणार इंडिया इज शाईनिंग बरं का? ७० हाजर करोड रुपयांचा धुराळा जाईल एकदोन माणसायच्या नाकातोंडात आणि बसंल हाळू हाळू खाली. सवयीनं.

पण मंडळी आमच्या आडाणीपणामुळं एवढा विचार करूनपन ७० हजार करोड म्हणजे किती हा सवाल आहे तसाच आहे. तुम्हाला कळंत आसंल तर आम्हला नक्की कळवा.

## अंतरंग


मागोवा

लसींची वारेमाप वापर - कोणाच्या हितासाठी? ...२

पारगावच्या पारावरुन... असलं लगीन नको गं बाई ...५

अभियान वार्ता

कसं असावं महिला धोरण? ...८

हमसफर ...१०

समानतेच्या दिशेने-प्रकल्प अहवाल प्रकाशित

माहितीच्या जगात ...११

बचत गटांचे निर्मल सॅनिटरी पॅड

गर्भलिंगनिदान करणाऱ्या डॉक्टरांना शिक्षा ...१२

मा
गो
वा

# लसींचा वारेमाप वापर - कोणाच्या हितासाठी?

**डॉ. अनंत फडके**

*आधुनिक औषधांपैकी लस हे सर्वात गुणकारी 'औषध' आहे कारण त्याने आजारच टळतो. आपला आहार, घरातील व बाहेरील स्वच्छता यामुळे जरी मुख्यतः जंतुजन्य आजार टळत असले, तरी त्याला पूरक म्हणून लसींचा वापर अतिशय फलदायी असतो. मात्र लसींचा भरमसाठ वापर केला तर तोटा होऊ शकतो. असा वारेमाप वापर करायची प्रथा औषध कंपन्यांच्या प्रभावाखाली वाढली आहे. 'पल्स पोलिओ' कार्यक्रमाअंतर्गत पोलिओ लसीचा तसेच काही खाजगी डॉक्टर्स करत असलेला नव्या लसींचा वारेमाप वापर जनतेच्या हिताचा नाही. लसीकरणाचा हा वारेमाप, आपमतलबी वापर रोखण्यासाठी डॉ. मित्तल, डॉ. पुलियल हे बालरोग तज्ज्ञ, काही सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ, आरोग्य मंत्रालयाचे माजी सचिव, डॉ. के. बी. सक्सेना व आरोग्य चळवळीतील काही डॉक्टर-कार्यकर्ते यांनी दिल्ली उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. लसींच्या या वारेमाप, अनिर्बंध वापरासंबंधीचा हा लेख.*

**'लसजन्य पोलिओ' मध्ये वाढ!**

'साबिन' या शास्त्रज्ञाने शोधलेली 'तोंडावाटे द्यावयाचे थेंब' या स्वरूपातील पोलिओ लस भारतात १९८८ पासून राष्ट्रीय लसीकरणाच्या कार्यक्रमात दिली जाते. भारतात १९८८ मध्ये पाच वर्षाखालील २४,२५७ बाळांना पोलिओमुळे पंगुत्व आले. लसीकरणामुळे हे प्रमाण १९९४ पर्यंत ८०% नी म्हणजे ४,७९३ पर्यंत उतरले. पण फक्त ६०% बाळांपर्यंतच साबिन-लस तेव्हा पोचत होती. ती सर्व बाळांना पोचवण्याचे उद्दिष्ट गाठून पोलिओजन्य पंगुत्व बहुतांश संपुष्टात आणता आले असते. पण देवीप्रमाणे पोलिओचे निर्मूलनच करायचे; कुपोषण, सार्वजनिक अस्वच्छता यांवर मात न करताही पोलिओचे विषाणू चार-सहा वर्षांतच इतिहासजमा करायचे असा अट्टहास काही तज्ज्ञांनी धरला. तो मुख्यतः पाश्चिमात्य कंपन्यांच्या हितासाठी, जागतिक आरोग्य संघटनेच्या प्रभावाखाली! साबिन लसीमुळे दर ४० लाख डोसमागे एक या दराने 'लसजन्य पोलिओ' होतो हे लक्षात न घेता पोलिओ-निर्मूलनाच्या मृगजळामागे धावत साबिन लसीचे डोस 'पल्स-पोलिओ' मोहिमेमार्फत प्रचंड वाढवले. त्यामुळे 'नैसर्गिक पोलिओ'मुळे पंगुत्व येणाऱ्या बाळांची संख्या वर्षाला ५० च्या खाली जरी आली, तरी दुसऱ्या बाजूला 'लसजन्य पोलिओ'मुळे पंगू होणाऱ्या बाळांचे प्रमाण वाढले. तज्ज्ञांच्या मते सध्या ते वर्षाला सुमारे २०० ते ३०० झाले आहे. 'राष्ट्रहितासाठी' पंगुत्व पदरात पडलेल्या या अभागी बाळांचे पुनर्वसन करा व त्यांच्या पालकांना नुकसानभरपाई द्या तसंच पल्स-पोलिओ कार्यक्रमाचा पुनर्विचार करा अशी 'जनस्वास्थ्य अभियान' ने मागणी करूनही त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले.

> लसीकरणाची गरज संपणे म्हणजे रोगाचे निर्मूलन होणे. जर ते होणार नसेल तर तथाकथित पोलिओ-निर्मूलनावर एवढा प्रचंड खर्च कशाला करायचा असा प्रश्न आहे. राष्ट्रीय कार्यक्रमात दिल्या जाणाऱ्या उरलेल्या ५ लसींसाठी वर्षाला सरकार ३५०-४०० कोटी रु. खर्च करते तर एकट्या पोलिओ निर्मूलनासाठी वर्षाला १००० कोटी रु. खर्च होत आहेत! शिवाय दुबळी सरकारी यंत्रणा सर्व लक्ष पोलिओ लसीकरणावर खर्च करू लागल्याने इतर लसी देण्याकडे दुर्लक्ष झाले आहे.

साबिन लसीमुळे होणाऱ्या पोलिओकडे सरकारने दुर्लक्ष केले तरी या ''साबिन लसीमुळे होणारा पोलिओ टाळण्यासाठी आम्ही बाळांना इंजेक्शनवाटे वेगळी लस देतो'' असे म्हणून आता खाजगी डॉक्टर्स 'साल्क' पोलिओ-लस देतात. पण एका इंजेक्शनला ४००-५०० रु. देऊ शकणाऱ्या मध्यम/श्रीमंत थरातील पालकांच्या बाळांना लसजन्य पोलिओ झाल्याचे ऐकिवात नाही! कुपोषण, अस्वच्छता ही पार्श्वभूमी असलेल्या गरीब थरातील बाळांना लसजन्य पोलिओ होतो.

२००० सालापर्यंत पोलिओ-निर्मूलन होणार होते. ते अजून झालेले नाही आणि होण्याचीही शक्यता नाही. लसीकरणातून देवीचे निर्मूलन झाले तसे केवळ लसीकरणातून पोलिओ-निर्मूलन शक्य नाही. कारण देवीपेक्षा पोलिओ आजाराची काही वेगळी वैशिष्ट्ये आहेत. ज्या देशात अनेक वर्षे पोलिओचा एकही रुग्ण सापडला नाही त्या देशात परत पोलिओचे रुग्ण काही वर्षांनी आढळले आहेत. कारण पोलिओचे विषाणू पूर्णपणे नाहीसे झालेले नसतात असा अनुभव आहे. त्यामुळे पोलिओचे रुग्ण आढळायचे बंद झाले तरी पोलिओ लसीकरण चालूच ठेवावे लागणार आहे. देवीचे विषाणू सर्व वातावरणातूनही नष्ट झाल्याने देवीचे लसीकरण थांबवूनही परत देवीचा आजार झाला नाही. देवीचे लसीकरण करण्यावरचा खर्च त्यामुळे कायमचा थांबला. पण तसे पोलिओबाबत होणार नाही. पोलिओ लसीकरणावरचा खर्च चालूच राहणार आहे. मग 'पोलिओ-

निर्मूलन' या शब्दाला अर्थ रहात नाही कारण लसीकरणाची गरज संपणे म्हणजे रोगाचे निर्मूलन होणे. जर ते होणार नसेल तर तथाकथित पोलिओ-निर्मूलनावर एवढा प्रचंड खर्च कशाला करायचा असा प्रश्न आहे. राष्ट्रीय कार्यक्रमात दिल्या जाणाऱ्या उरलेल्या ५ लसींसाठी वर्षाला सरकार ३५०-४०० कोटी रु. खर्च करते तर एकट्या पोलिओ निर्मूलनासाठी वर्षाला १००० कोटी रु. खर्च होत आहेत! शिवाय दुबळी सरकारी यंत्रणा सर्व लक्ष पोलिओ लसीकरणावर खर्च करू लागल्याने इतर लसी देण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. उदा. महाराष्ट्रात १९९८-९९ ते २००५-६ या काळात या इतर लसी मिळालेल्या बाळांचे प्रमाण ७८.४% वरुन ५८.८% पर्यंत कमी झाले होते! त्यामुळे पोलिओ-निर्मूलनाचा कार्यक्रम म्हणजे आतबट्ट्याचा कारभार झाला आहे. दुसरे म्हणजे साबिन लसीच्या या अतिरेकामुळे अनपेक्षितपणे दुसराच मोठा गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. 'तात्पुरता लुळेपणा' येणाऱ्या बाळांचे प्रमाण १९९८ ते २००९ या काळात ९४६१ वरून ५०,३७१ पर्यंत (पाच पट) वाढले! (पहा www.npspindia.org हे अधिकृत संकेत स्थळ.) ही वाढ म्हणजे केवळ संख्याशास्त्रीय गोष्ट आहे; प्रत्यक्षात एवढी बाळे कायमची पंगू होत नाहीत अशी अधिकृत भूमिका आहे. पण २००६, २००७ सालासाठी उत्तर प्रदेशातील अशा बाळांचा पाठपुरावा डॉ. जेकब पुलियल या बालरोग तज्ज्ञाने 'माहितीचा अधिकार' मार्फत केल्यावर कळले की यांपैकी ४०% बाळांना कायमचे पंगुत्व आले होते!



### 'हेपॅटायटिस बी' लसीचा राष्ट्रीय कार्यक्रमात समावेश

काही बालरोग तज्ज्ञ अयोग्य प्रभावाला बळी पडल्यामुळे लसीकरणाचा राष्ट्रीय कार्यक्रम बदलण्याचे दुसरे उदाहरण म्हणजे 'हेपॅटायटिस बी' किंवा 'ब कावीळ' लसीचा राष्ट्रीय कार्यक्रमात समावेश. देशातील २% पेक्षा जास्त जणांना हेपॅटायटिस बी च्या विषाणूंची दीर्घकालीन लागण झाली तर सर्व नवजात बाळांना ही लस टोचावी अशी जागतिक आरोग्य संघटनेची शिफारस होती. चुकीची आकडेवारी देऊन काही 'तज्ज्ञ' मांडत राहिले की भारतात हे प्रमाण २% पेक्षा जास्त आहे. इंडियन मेडिकल असोसिएशनने प्रसिद्ध ज्येष्ठ बालरोग तज्ज्ञ एस. के. मित्तल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या तज्ज्ञांच्या समितीने सर्व सर्वेक्षणांचा आढावा घेऊन हे प्रमाण १.६०% इतके आहे असा निष्कर्ष काढला तरी त्याकडे 'अर्थपूर्ण' दुर्लक्ष करण्यात आले!

खरं तर भारतात सुमारे ज्या २% गरोदर स्त्रियांना ब काविळीच्या विषाणूंची लागण झाली आहे त्यांच्या बाळांना जन्मल्यावर ४८ तासात लस टोचण्याची खूप गरज आहे. कारण अशा आयांकडून त्यांच्या बाळांना जन्मतःच ही लागण जाण्याची शक्यता असते व अशी जन्मतःच झालेली लागण फार धोकादायक असते. त्यामुळे ब काविळीची लागण झाली आहे का हे तपासण्यासाठी सर्व गरोदर स्त्रियांची रक्त तपासणी केली पाहिजे. (खर्च फक्त २५ रु.) ज्या २-३% स्त्रियांमध्ये ही लागण झालेली आढळेल अशांच्या बाळांना जन्मल्यावर ४८ तासात ब कावीळविरोधी लस द्यायला हवी. पण हा कार्यक्रम न घेता सरसकट सर्व बाळांना दुसऱ्या महिन्यापासून ही लस टोचायचा कार्यक्रम घ्यायचे ठरत आहे! या कार्यक्रमात ज्या वर निर्देशित बाळांना जन्मतः लस मिळायला हवी, ज्यांना ब काविळीचा धोका सर्वात अधिक त्यांनाच नेमके या सार्वत्रिक लसीकरणातून संरक्षण मिळणार नाही! २-३% बाळांना लस टोचण्यापेक्षा सर्व बाळांना लस टोचून औषध कंपन्यांना मोठा धंदा मिळणार आहे म्हणून हा सार्वत्रिक लसीकरणाचा खर्च सरकारच्या गळ्यात बांधला जात आहे. इतर ५ लसींसाठी मिळून सरकारचे ३०० कोटी खर्च होतात तर तीन वेळा ही लस टोचण्यासाठी सरकारला दर बाळामागे फक्त ५० रु. लसीसाठी खर्च येईल असे जरी गृहीत धरले (सध्या वेष्टनावर लिहिलेली (एम.आर.पी.) एका डोसची किंमत ५० रु. आहे.) तरी दर वर्षी १२५ कोटी रु. खर्च होतील.

### नव्या लसींचा मतलबी वापर

आता इतर नव्या लसी भारतातही बाजारात आल्या आहेत. त्यातील काहींबद्दल प्रश्नचिन्हे आहेत. उदा. न्युमोनियाविरोधी लसीच्या ज्या संशोधन निबंधाचा दाखला देऊन तिची शिफारस केली जाते त्यात आढळले की या लसीने फक्त २५% मुलांना न्युमोनियापासून संरक्षण मिळाले व मृत्यूचे प्रमाण ५% नी कमी झाले. मात्र ही लस दिलेल्या मुलांमध्ये दम्याचे प्रमाण जवळ जवळ दुप्पट झाले. भारतात मुळात न्युमोनियाने मृत्यूचे प्रमाण १%च आहे. शिवाय न्युमोनियाच्या जिवाणूंच्या उपप्रकारांपैकी भारतात फक्त ५३% उपप्रकारांपासूनच ही लस संरक्षण देते. हे सर्व लक्षात घेता पुरेसे संशोधन झाल्याशिवाय या लसीचा वापर करणे शहाणपणाचे नाही. समजा, बाळाला न्युमोनिया झाला तर औषधाचा खर्च सहसा ३० ते ५० रु. येतो. (साध्या औषधांना दाद न देणाऱ्या थोड्या केसेसचा अपवाद वगळता) मात्र लसीकरणाचा पालकांना सध्या १६ ते ३० हजार रु. खर्च येतो!

'हिब (Hib) जिवाणूमुळे मेंदू-आवरणाला सूज' (Hib meningitis) या गंभीर आजारापासून चांगले संरक्षण देणारी लस उपलब्ध आहे. पण जी कोणती प्रभावी, निर्धोक लस निघेल ती प्रत्येक बाळाला टोचायची असे नाही. त्या आजाराचे प्रमाण, त्याचे दुष्परिणाम, लसीचा खर्च यांचाही त्या लसीचा, विशेषतः राष्ट्रीय

## अवास्तव किंमतीमुळे पालकांना अकारण पडणारा भुर्दंड

| क्रमांक | लसीचा प्रकार | डॉक्टरांना पडणारी किंमत (रु.) | वेष्टनावर लिहिलेली किंमत (एम.आर.पी.)(रु.) | पालकांकडून घेतले जाणारे शुल्क (रु) |
|---|---|---|---|---|
| १) | वेदनारहित डी.पी.टी.लस | ७१७ | १२२० | १३०० |
| २) | हेपॅटायटिस बी | ३२ | ४५ | १०० |
| ३) | हिब मेंदूज्वर | १४५ | ४१० | ५५० ते ६०० |
| ४) | पेंटॅ लस (बिनदुखरी ट्रिपल + हेप.बी+हिब मेंदूज्वर) | १३०८ | १७३५ | २००० ते २६०० |
| ५) | पोलिओ इंजेक्शन | २५० | ३९५ | ४०० ते ६०० |
| ६) | गोवर | ३६ | ४५ | २५० |
| ७) | गोवर, गालगुंड, रुबेला (MMR) | ७१ | ८७ | ४०० |
| ८) | हेपॅटायटिस ए | ७९५ | ९०६ | १००० |
| ९) | कांजिण्या | १०५५ | १४३० | १५०० |
| १०) | रोटा डायरिया | ८०७ | ९९९ | १५०० |
| ११) | न्युमोनिया | ३०७० | ३८०१ | ४००० ते ७५०० |
| १२) | फ्लूविरोधी | ४४९ | ५८० | १५०० |

कार्यक्रमात समावेश करताना विचार करायला हवा. लाखो बाळांना ही लस टोचल्यावर जेवढे मृत्यू, आजारपणे टळतील त्यावरून बाळाचे एक वर्ष आयुष्य वाचवण्यासाठी किती खर्च येतो ते काढायला हवे व इतर लसींची त्यासोबत तुलना करायला हवी. पण 'राष्ट्रीय तांत्रिक सल्लागार गट' या तज्ज्ञांच्या गटाने असा हिशोब न मांडताच राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमात या लसीचा समावेश करायची शिफारस केली! भारतातील मान्यवर संशोधनात आढळले आहे की भारतात या आजाराचे प्रमाण खूप कमी, म्हणजे दर लाख बाळांमागे केवळ ७ आहे (पाश्चिमात्य देशात ते लसीकरण सुरु करण्याआधी याच्यापेक्षा हे प्रमाण तिप्पट ते दसपट होते.) याकडेही या 'तज्ज्ञांनी' साफ दुर्लक्ष केले! त्यामुळे संबंधित कंपन्यांच्या 'प्रभावाखाली' ते आहेत का हे तपासायला हवे. कारण जगभरचा, जागतिक आरोग्य संघटनेबाबतचाही अनुभव सांगतो की अशा कमिट्यांवर कधीकधी मतलबी तज्ज्ञ पेरलेले असतात.

धनुर्वात, डांग्या खोकला, घटसर्प यांच्यापासून संरक्षण देणारी 'ट्रिपल' लस सरकारी कार्यक्रमात मोफत तर बाजारात १५-२० रु. ला मिळते. त्यातील 'डांग्या खोकला' वरील लसीमुळे इंजेक्शनची जागा सुजून १-२ दिवस ताप येतो. त्यावर साधे क्रोसिनचे औषध दिले की काम भागते. पण असा त्रास होणार नाही अशी 'बिनदुखरी' लस निघाली आहे. पण ती फार महाग म्हणजे १३०० रु. ला आहे! अनेक डॉक्टर्स पालकांना स्पष्ट सांगत नाहीत की या 'बिनदुखऱ्या' लसीचा दुसरा कोणताही फायदा नाही.

वर निर्देशित नव्या, महागड्या लसींच्या वापराला शास्त्रीय पाया नसूनही त्यांचा वापर वेगाने वाढतो आहे कारण या लसी देण्यात डॉक्टरांना विनासायास कमाई होते. या नव्या लसी औषध दुकानदारांमार्फत न विकता औषध कंपन्या थेट डॉक्टरांना चांगला डिस्काऊंट देऊन विकतात. डॉक्टरांनी लस टोचण्याचे शुल्क व औषध-विक्रीवर दुकानदारांना मिळणारा नेहमीचा १५% नफा घेणे ठीक आहे. पण अनेक डॉक्टर्स त्यापेक्षा जास्त शुल्क आकारतात. बहुसंख्य रुग्णांना लसीची किंमत माहिती नसल्याने व पालक असहाय्य असल्याने या नव्या लसींबाबत पालकांना अकारण किती भुर्दंड बसतो ते वरील तक्त्यावरून लक्षात येईल. 'डॉक्टरांची लसीकरणाबाबतची कन्सल्टेशन फी' असे म्हणून या जादा फीचे समर्थन केले जाते. पण प्रत्यक्षात लसीबाबत दरवेळी सल्लामसलत होत नाही. मुळातच लसीच्या छापील वेळापत्रकानुसार 'ज्याला परवडेल त्याला' या 'तत्त्वा' नुसार या लसी दिल्या जातात. हे सर्व लक्षात घेता डॉक्टरांच्या संघटनांनी भूमिका घ्यायला हवी की डॉक्टरांनी वेष्टनावर छापलेल्यापेक्षा जास्त किंमत आकारू नये; 'कन्सल्टेशन'ची वेगळी पावती द्यावी. दुसरे म्हणजे डॉक्टरांना मिळणाऱ्या डिस्काऊंटचा पालकांना फायदा करून देण्याचे काम डॉक्टरांच्या संघटना, धर्मादाय इस्पितळे यांनी करावे. ही अपेक्षा अवाजवी आहे का?

डॉ. अनंत फडके
ईमेल : anant.phadke@gmail.com
दूरध्वनी : 9423531478

# असलं लगीन नको गं बाई...

पारगावच्या पारावरुन

तुमाला सांगू मंडळी, मला ना आताशा कुनाकडे जावंसंच वाटत नाही बगा. कुटं बी गेलं तरी एकच प्रश्न. लगीन जालं? जिचं झालं तिला - पोरं किती? जिला हायेत तिला - पोरगा हाय का? अन् जिचं लगीन झालं, जिला पोरं झाली, जिला पोरगा बी झाला तिला ऑपरेशन केलं का? येवडी सगळी माहिती मिळाली तरच ओळख पटती बगा बाईची. या सगळ्यात जी बसत न्हाई ती काय बाई नसती का काय? मी लगीन केलं न्हाई त्यामुळे बहुतेक लोकावासाठी माझा काय बी उपेग न्हाई बगा. आता मीच कानाआड करते त्यांचं बोलणं.

गावात गेल्या सोमवारी हिरामायच्या पोरीचं लग्न लागलं. काय धामधूम, काय खर्च? इचारू नका. त्येचीच चर्चा चाललीये वाटतं. बगू तरी कमळी काय बोलायलीये ते.

'हिरामाय, लगीन लई झाक लावलंस बग पोरीचं. समदे नाव काढत व्हते. सुखात राहील आता सासरी.'

'मंग, लगीन एकदाच व्हतंय की माय. आन् फुडं चालून लेकीचंच तर होनार हाय समदं.'

'पोरगा लईच तराट हाय म्हनं. वरमाय त्येवडी पाह्यां नाय भेटली.'

'आत्ता? लगीन पाह्यलं अन् वरमाय नाय पाह्यली? नवलाचंच बोलायलीस बाई कमळाक्का. शोधून गावनार नाहीत असली मान्सं हाइत. धा एकर रान हाय, हीर हाय, बोअर हायता दोन. जवारी, सोयाबीन, उडीद, मूंग, तुरी...समदं निगतंय रानात. लाखभराचा ऊस होतोय. काय बी कमी नाय बग.'

'मोठं खटलं हाय म्हन की...'

'मंग, दोन दीर, दोन जावा, चुलते-चुलत्या. सासू-सासरा. थोरली ननद त्येवडी दूर हाय बग. बाकी घर भरलेलं हाय बग, लेकरं, सुना...'

'पर रानातलं काम हुतंय का सुवर्णाला? शाळाच शिकलं की लेकरु. कदी रानात गेली नाय.'

'कामाचं सोड. सासऱ्यानं बैठकीच्या टायमालाच सांगितलं. तुमच्या लेकराला रानात धाडनार न्हाय. तिनी फकस्त घरच्या अन् गड्यावाच्या भाकरी करायच्या आन् लहान लेकरं सांभाळायची.'

'अगं हुत असतील की ५०-६० भाकरी. जमंल का सुवर्णाला?'

'मी काय म्हनलं तिला. भाकरी अन् लेकरं सोडली तर आरामच हाय की. धुनी भांडी काय... हुतात लगोलग.'

'हां. आता सोताचा संसार म्हनला की त्येवडं तरी कराया लागनारच की.'

'त्येच्यासाठी तर आपला जलम हाय. संसाराबिगर बाईला शोभाच न्हाई बग.'

'काय बोलली हिरामाय, पुन्यांदा सांग.'

'आली का मंजुळी? काय नाय पोरीच्या डोईवर तांदूळ पडले त्येचंच बोलत व्हतो. गळ्यात काळी पोत बांधली ना पोरीच्या, तवा कुटं चेहऱ्याला शोभ आली बग.'

'अस्सं?काळी पोत अन् मनी घातले की झालं. बाकी काईच न्हाई का पोरीचं?'

'म्हंजी? मंजुळे, नीट उकलून बोल बग.'

'अगं कमळे, जिकडे बगावं तिकडे लोक निस्ते पोरीवाच्या मागं हाईत बग. पावणे आणा, लगीन करा, उजवून टाका. पोरींचा काय इचारच नाई बग.'

'आत्ता? बरोबरच हाय. परक्याचं धन, किती दीस घरात ठेवनार? वेळ आली की ज्येचं त्येला देऊन टाकायचं.'

'कसं बोलती गं हिरामाय तू? पोरगी जलमली की तिच्या कपाळावर परक्याचं नाव लिवती का काय तुजी सटवाई.'

'मंग, समदं नशीबच लिवती ती.'

'म्हंजी कुनाशी गाठ बांधनार त्ये बी.'

'व्हय. त्ये बी.'

'अरारारारा, मला जर म्हाईत अस्तं ना तर माज्या कपाळावर शिवाचंच नाव लिवाया लावली असती बग.'

'मंजुळे, आता हा शिवा कोन अजूक?'

'अगं, लई आवडायचा त्यो मला. कामाला धट, कुनाच्या अध्यात ना मध्यात. मला तर त्येच्याच गळ्यात माळ घालायची हुती बग.'

'मंग करायची हुतीस की.'

'कसलं काय. आमच्या समाजाचा नव्हता ना तो. मंग माय बापानं बांधली मालकाच्या गळ्यात. ही काळी पोत फासागत वाटली हुती बग तवा.'

'असं इपरित बोलू नाय माय.भाग्यवान बाईलाच लाभती ती.'



‘कसलं भाग्य कुनास ठाऊक. लगीन म्हंजी खेळच वाटतो पोराकडच्याला. लग्नातच शोभा करतात काय काय जन.’

‘ह्ये मात्र खरंय बग. माज्या नन्दंचा नवरा तर बनियन चड्डीसाठी रुसून बसला व्हता माय. काय सांगावं?’

‘तसाच हुबा करायचा व्हता त्येला लग्नाला. असलं असतं का?’

‘आमच्यात लई असत्यात बग येकेक. कुनाला काय तर टिळ्याला चांदीचा रुपया लागतो, अन् कुनाला काय तर म्हनं ताटाला नोटेचं टेकन. सुवर्णाच्या लग्नात बी थोरला चुलता रुसला व्हता. बापानं हजाराची नोट ठेवली तरा कुटं घास गेलं त्याच्या तोंडात.’

‘असतात गं येकेक. माज्या मावशीनं मावळनीचं ताट केलेलं तर तिच्या विहीनबाईनं माघारी पाठिवलं. का तर म्हनं त्यात पळी न्हाई म्हनून. काय दुकान हाय का मांडलेलं?’

‘आता परवा आमच्या भाच्याच्या लग्नात तर लईच धमाल. तीन लग्नं एकाच मांडवात. सगळे पाव्हणे नुसते रुखवत आणि संसारच पाह्यले होते. माझी बहीन रुसूनच बसली. का तर म्हने तिच्या पोराला आला कूलर आणि तिच्या शेजारनीच्या पोराला तो चार तासवाला जनरेटर का काय तो असतोय न्हवं तो आला. लाईट जातच न्हाई म्हनं त्यानी. अखेर दिवाळीला सहा तासवाला घेऊन देतो म्हन्ला पावणा, तवा आली मांडवात वरमाय.’

‘काय येकेकाच्या तऱ्हा बाई. आपली नानी न्हाय का? समद्या लोकावाच्या लग्नाला जाती, जेवती, लुगडं बी नेसून येती. आन् आली की सुरु... हलकंच नेसविलं माय...अन् भातच कच्चा. कुनाची जिलबीच वाईट तर कुनी पुऱ्याच कशा नाय केल्या.’

‘खरंय बाई.’

‘पोराकडचे खास तिला घेऊन जातात... रुसायला. आता इतकी लुगडी घेऊन काय लोनचं घालनार हाय का? पेट्या भरुभरु निस्ती लुगडी अन् टाइल टोप्या. इकाया काढली तर वरली माडी हुईल बांधून.’

‘जाऊ दे गं. जुनं खोड हाय. एरवी कोन पुसतंय तिला? म्हणून मिरवून घेती. बाईचा जलमच हाय असला.’

‘कसला गं असला जलम. कुनाच्या तरी भाकरीची सोय म्हनून पोरीचं आयुष्य बरबाद करतेत बग. आता भाकरी टुकडा घालाया ती काय सैपाकीन हाय?’

‘मंजुळे, काय भांडून आलीस की काय मालकाशी?’

‘भांडाया कशाला हवंय. रोजचंच हाय बग. आंघुळीचं पानी द्या, कापडं काढून ठिवा, पान्याचा तांब्या बी हातात. निस्तं खाटंवरुन पाटावर आन् पाटावरुन खाटंवर. उगा म्हनायला घरची लक्ष्मी, नोकरच आपुन.’

‘अगं आपल्याच मानसाचं करायलीस ना? धन्याची शेवा करशील तरच स्वर्गात जाशील.’

‘अन् त्यो? त्येला डायरेक्ट पास हाय का काय स्वर्गाचा? माज्या बापानं काय पाहून गळ्यात बांधली काय ठावं. मानूस कसा हाय काय पाह्यलं नाय. निस्तं रान आन् हीर. उद्या उडी टाकाया पोरीची सोय पाह्यली का काय ठावं?’

‘म्हंजी लगीन झालं तर कायच सुख न्हाई म्हन की. का त्या बाबीसंगं राहून अशी करायलीस?’

‘तिला का उगा नावं ठिवता गं? छान मजेत ऱ्हाती, फिरती, लगीन केलं नाई म्हनून तुमच्यासाठी बादच झाली ती. काय कमी हाय गं

तिच्यात? हुश्शार हाय, देखनी हाय.'

'पर उपेग काय देखनं असून? तिच्या मागच्या किती पोरींची लग्नं झाली तरी ही इथंच हाय अजून. भावाच्या घरात. आता बाब्या हाय चांगला म्हून ठिवून घेतलंय. एकांदा म्हन्ला आसता, तुजी तू सोय बग. तर?'

'आत्ता? त्यो पोरगा... म्हनून लगीच घर त्येचं. अन् त्येच्याहून मोठी असून, त्या घरात राबत असूनसुदीक ही मात्र परकी...कसला गं न्याय तुजा हिरामाय? तिचा काहीच वाटा न्हाय.'

'असतो की. पर तो फकस्त चोळी बांगडीचा अन् सणावारी म्हायेरात येण्याचा. लगीन करावंच लागतं माय.'

'आगं करावं की. पर नसंल एकांद्याला करायचं तर काय यवडं त्यात? लगीन सोडून किती तरी गोष्टी करता येतात की. शिकता येतं, काम करता येतं, हिंडता फिरता येतं. आता माजंच घे. पारगाव अन् घारगाव ... दोन गावं सोडून कदी कुनी नेलंय का कुटं फिराया? पोरीनं शिक्षन सोडायचं, सासरात जायाचं, घरच्यांचं पोरा-बाळाचं करायचं, राब राब राबायचं अन् तसंच संपून जायचं... असलं असंल तर काय गं लगीन करुन, सांग ना हिरामाय?'

'खरंय म्हना ते बी.'

'अन् मंजुळे, लगीन बी कसं, इतरांचंच ऱ्हातं. आहेरं, जेवनं, हुंडा, हाच अडून बसला, नाय तर तीच रुसून बसली. एकेका लग्नाचा खर्च लाखावर जातो. किती पैका जातो गं. पोरीकडच्यांना तर साफच करतात बग पोराकडले. उगा कशापायी येवडा खर्च करायचा?'

'अगं रीत पडली हाय बाई आता तशी. तू म्हन्तीस तसं मंग काय कोर्टात कराचं का काय कमळे?'

'अगं कसं का करंना... सुखानी करावं. पोरीच्या बापाला ऋण काडाया लावून सुख लागंल का अंगाला? बड्या लोकाचं पाहून गरीबी परिस्थितीतला मानूस बी तसंच करु पाहतो न्हवं? सगळ्यांनीच थांबवावा बग डामडौल. तरीच पोरी सुखात राहतील.'

'हां... अन् त्यांना शिकू द्यावं, काम करु द्यावं अन् तिच्या मनावर करुन द्यावं बग. उगा गोत्र अन् पदर पहात कशापायी बसायचं? आता आमचे मालक सांगायले होते, एका गावात एक पोरगी एका पोराबरोबर पळून गेली, लगीन बी लावलं घरच्यांन्ला न सांगता. तर दोगांच्या घरच्यांनी कुठून तरी बामनाला सांगून त्यांचं गोत्र काढून त्ये दोगं बहीन भाऊ लागत्यात असं सांगितलं अन् पंचायतीनीच त्येंचं लगीन मोडलं बग. काय वाटलं असंल गं त्येंना? जात, धरम, समाज, आपुनच तयार केलाय न्हवं. त्याच्या आतला मानूस एकच ऱ्हातो की.'

'लई तत्त्वज्ञान सांगाया लागलीस बग मंजुळे... मास्तरीनच व्हाया पायजे व्हतीस बग.'

'झाले असते माय... पर लगीन लावलं ना बापानं. म्हनून राहिले.'

किती सांगू मी, सांगू कुणाला
किती सांगू मी, सांगू कुणाला
मला कायद्याचा आधार मिळाला ।।धृ।। (२ वेळा)

रोज मला मारिती, शिवीगाळ करिती,
मुलांना हिसकावती
हात मी जोडिते, पाया मी पडिते, बेघर मला करिती
आता जावू कुठे? मी राहू कुठे?
मला कुठेच थारा मिळेना
पण कायद्याचा आधार मिळाला ।।१।। (२ वेळा)

अभियानामुळे मला माहिती मिळाली
चेतनाच्या कामाची
आधार गटाने दिला निवारा, सोय केली जेवणाची
दिला कपडा लत्ता, केले औषधपाणी,
आणि कायमचा विश्वास मिळाला
मला कायद्याचा आधार मिळाला ।।२।। (२ वेळा)

संरक्षण अधिकाऱ्याने घटना अहवाल लिहिला
अर्जही दाखल केला,
तीन दिवसात सुनावणी झाली, आदेश मला मिळाला
खर्चासाठी पैसा, राहण्यासाठी घर,
मला मुलांचा ताबा मिळाला
मला कायद्याचा आधार मिळाला ।।३।। (२ वेळा)

पीडित महिला, लहान मुले कायद्याने सावरली
चेतनाच्या साथीने, कायद्याच्या मदतीने
कुटुंबे वाचवली
दादा तुम्ही बी घ्या, ताई तुम्ही बी घ्या,
समदे कायद्याचा आधार घ्या ना
मला कायद्याचा आधार मिळाला ।।४।। (२ वेळा)

चेतना महिला विकास केंद्र, पुणे-सिंधुदुर्ग
(०२० २६३५ ४९५६)

अभियान वार्ता

# कसं असावं महिला धोरण?

१९९४ साली महाराष्ट्र सरकारने राज्याचे महिला धोरण जाहीर केले. त्यानंतर २००१ साली या धोरणामध्ये काही सुधारणा करण्यात आल्या आणि महाराष्ट्र हे किती 'पुरोगामी' आहे हे सरकारने दाखवून दिलं. आता १० वर्षांनंतर पुन्हा महिला धोरणाची चर्चा सुरु झाली आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ म्हणजेच माविमवर हे धोरण तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

सध्या चालू असलेली धोरण तयार करण्याची प्रक्रिया आणि चर्चेसाठी उपलब्ध असणार मसुदा याबद्दल स्त्री मुक्ती आंदोलन संपर्क समितीने आवाज उठवला आहे व ही प्रक्रिया तात्काळ थांबवावी अशी मागणी केली आहे. ज्या संस्था संघटनांना या आंदोलनात सामील व्हायचे असेल त्यांनी समितीशी संपर्क साधावा.

या प्रक्रियेबद्दल जे आक्षेप आहेत त्यासंबंधी एक निवेदन मा. मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आले आहे. ते जिव्हाळ्याच्या वाचकांसाठी संक्षिप्त रुपात देत आहोत.

**धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेला विरोध**

मुंबईमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळ या सरकारी महामंडळाच्या वतीने धोरणावर चर्चा करण्यासाठी, धोरणावर विचार आणि सूचना मांडण्यासाठी प्रामुख्याने पुणे आणि मुंबईस्थित काही 'तज्ज्ञांना' या बैठकींना निमंत्रित केले गेले आहे. ही सर्व प्रक्रिया सहभागिता, पारदर्शी व्यवहार आणि उत्तरदायित्व या तीनही तत्त्वांची पायमल्ली करत आहे.

महाराष्ट्राला अतिशय सक्रीय आणि कृतीशील स्त्री चळवळीचा वारसा आहे. गेल्या अनेक दशकांपासून स्त्री चळवळीने केवळ राज्यातीलच नाही तर देशभरातील स्त्री प्रश्नासंबंधीची धोरणं आणि व्यवहार यावर प्रभाव टाकला आहे. असं असताना राज्याचे महिला धोरण तयार करण्याची प्रक्रिया एखाद्या महामंडळाकडून करवून घेणं ही निश्चितच खेदजनक बाब म्हणायला हवी. १९९३ मध्ये एका विशेष कायद्यान्वये राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाच्या संकेतस्थळावरही नमूद करण्यात आले आहे की 'जून १९९३ मध्ये महिला व बाल विकास हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला आहे. हा विभाग राज्याचे महिला धोरण करणारी प्रमुख यंत्रणा (नोडल एजन्सी) असेल'. परंतु महिला आयोग किंवा राज्याच्या महिला बाल विकास विभागाचा धोरण तयार करण्यामध्ये थेट सहभाग दिसत नाही.

म्हणूनच सध्याची धोरणनिर्मितीची प्रक्रिया ताबडतोब थांबवण्यात यावी अशी आम्ही मागणी करत आहोत. ही संपूर्ण प्रक्रिया नव्याने सुरु करण्यात यावी जेणेकरुन ती व्यापक, पारदर्शी व उत्तरदायी असेल. यासाठी महाराष्ट्र शासनाने पुढील कृती करावी अशी आमची अपेक्षा आहे.



**१. व्यापक सल्लामसलत आवश्यकः** राज्यभरातल्या अनेक महिला संघटनांना या प्रक्रियेची अजिबात माहिती नाही आणि त्यामुळे त्या त्यांची मतं आणि सूचना देऊ शकणार नाहीत. राज्यातल्या बहुतेक सर्व विद्यापीठांमध्ये स्त्री अभ्यास केंद्रं स्थापन करण्यात आली आहेत. संघटित क्षेत्राबाहेरही अनेक महिला असंघटित क्षेत्रात काम करतात. या महिला ट्रेड युनियनच्या माध्यमातून संघटित झाल्या आहेत. लिंगभावाच्या, स्त्री पुरुष समानतेच्या मुद्द्यांवर काम करणारी अनेक नेटवर्क राज्यात कार्यरत आहेत. या सर्वांनाच धोरणनिर्मितीच्या प्रक्रियेत सामील करुन घेऊन ही सर्वच प्रक्रिया जास्त व्यापक करण्यात यावी.

**२. राज्य महिला आयोग आणि महिला बाल विकास विभागातर्फे विभागीय पातळीवर सुनावण्याः** राज्य महिला आयोग आणि महिला व बाल विकास विभाग यांनी संयुक्तपणे धोरणाचा योग्य मसुदा तयार करण्यात आणि त्या मसुद्यावर व्यापक पातळीवर चर्चा आणि विचारविनिमय व्हावा यासाठी पुढाकार घ्यावा. आणि याकरिता राज्याच्या सर्व विभागातील प्रमुख ठिकाणी सुनवाई आणि चर्चा घेण्यात यावी. राज्याचे सांस्कृतिक धोरण, जलनीती, ऊर्जाविषयक धोरणाप्रमाणे महिला धोरण तयार करतानाही अशीच पद्धती वापरली जावी. ५०० शब्दाच्या आणि नाममात्र बक्षीसपात्र निबंध स्पर्धेचा विषय बनवून या विषयाचं अवमूल्यन करण्यात येऊ नये.

**३. धोरणाचा मराठी मसुदा सर्वांसाठी खुला करावाः** सध्या तयार करण्यात आलेला मसुदा चर्चेसाठी उपलब्ध नाही. सगळ्यावर कडी म्हणजे हा मसुदा इंग्रजीत तयार करण्यात आला आहे. आमची अशी मागणी आहे की हा मसुदा मराठीमध्ये तयार करण्यात यावा जेणेकरुन राज्यातील कोणाही इच्छुक व्यक्तीला तो समजू शकेल.

**४. धोरण निर्मितीत आंतरराष्ट्रीय संघटनांचा सहभाग नकोः** काही बैठकांना युएनएफपीए (संयुक्त राष्ट्रसंघ लोकसंख्या निधी) या आंतरराष्ट्रीय संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते. युएनएफपीए ही आंतरराष्ट्रीय संस्था असून ती लोकसंख्या धोरणासंबंधीच्या मुद्द्यांवर कार्यरत आहे. स्वायत्त भारताच्या एका घटक राज्याचं धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये अशा आंतरराष्ट्रीय संस्थेला का सहभागी करुन घेण्यात आलं आहे याचा खुलासा करण्यात यावा अशी आमची मागणी आहे. युएनएफपीए किंवा तत्सम कोणतीही आंतरराष्ट्रीय संस्था या प्रक्रियेत सहभागी असू नये अशीही आमची मागणी आहे.

**५. कालमर्यादा ठरवण्यात यावीः** निश्चित अशी कालमर्यादा ठरवून ही सर्व प्रक्रिया ऑक्टोबर २०१०पासून पुढील सहा महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

**मसुद्यातील तरतुदींबद्दलचे काही मुद्दे**

सर्वप्रथम, पहिलं महिला धोरण जाहीर झाल्यापासून गेल्या १६ वर्षांचा आढावा यामध्ये घेण्यात आलेला नाही. सध्याचा मसुदा हा स्वतंत्र असून त्याचा १९९४ किंवा २००१ च्या धोरणाशी काही संबंध दिसत नाही.

स्त्रियांच्या समानतेचं व्यापक उद्दिष्ट मांडणारी प्रस्तावना तर मसुद्यात नाहीच पण सर्वसमावेशक आणि सर्वांगीण पद्धतीने स्त्रियांच्या मुद्द्याचा विचार करणारी मांडणी व रचनाही नाही. मसुद्यातील तरतुदी कल्याणकारी किंवा उपकारक दृष्टीकोनातून केलेल्या दिसतात. अशी कल्याणकारी विचारसरणी धोरणकर्त्यांनी केव्हाच सोडून दिली आहे आणि स्त्री प्रश्नाचा विचार हक्कांच्या दृष्टीकोनातून होऊ लागला आहे. स्त्रियांच्या प्रश्नावरच्या अतिशय जिवंत आणि सजग लढ्यांचा इतिहास महाराष्ट्राला आहे आणि इथल्या स्त्रियांचे प्रश्न जसे इतर व्यापक प्रश्नांपासून वेगळे काढता येत नाहीत तसेच ते केवळ हिंसा आणि लैंगिक शोषणापुरते संकुचितही करता येत नाहीत; स्त्रियांच्या प्रश्नाकडे व्यापक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय संदर्भात पाहिले गेले पाहिजे ही समजच या मसुद्यात कुठे दिसत नाही.

मसुद्यातील काही तरतुदी वंचित घटकांतील स्त्रियांसाठी अधिकच घातक आहेत. सरकारी नोकऱ्यांमधील अनुसूचित जाती जमातीतील स्त्रियांसाठी राखीव असणाऱ्या जागा योग्य उमेदवार न मिळाल्यास एक वर्षानंतर खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी खुल्या करण्याचा म्हणजेच थोडक्यात जातीचे आरक्षण रद्द करण्यासंबंधीचा निंदनीय प्रस्ताव याचं लख्ख उदाहरण आहे.

तसंच भारतीय दंड विधानाच्या ४९८ अ या कलमाचा स्त्रिया दुरुपयोग करतात या प्रतिगामी धारणेला स्त्री संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला असताना मसुद्यात मात्र या धारणेचं समर्थन करण्यात आलं आहे. दलित, आदिवासी, भटक्या तसंच अल्पसंख्य समाजातील स्त्रिया किंवा राज्याच्या दुर्लक्षित भागातील स्त्रियांची आर्थिक सामाजिक स्थिती भिन्न आहे हे लक्षात घेऊन धोरण आखण्याची गरज आहे या वास्तवाकडे मसुद्यात पूर्णपणे डोळेझाक करण्यात आली आहे. मसुद्यामध्ये इतरही अनेक त्रुटी आहेत.

तरी, राज्य महिला आयोग आणि महिला व बाल विकास विभागाने ही संपूर्ण प्रक्रिया नव्याने सुरु करावी आणि महिला धोरण २०१० चा एक पर्यायी मसुदा तयार करावा अशी आमची विनंती आहे. या मसुद्यात आधीच्या धोरणांचा आढावा घेण्यात यावा. राज्यातील महिलांसंबंधीची माहिती, आकडेवारी जाहीर करावी जिच्या आधारावर आधीच्या कार्यक्रमांचं मूल्यमापन करता येईल आणि नव्या कार्यक्रमांची आखणी करता येईल. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या मसुद्यात भारतीय संविधानाने मांडलेल्या हक्कांच्या चौकटीत स्त्रियांच्या हक्कांचा विचार केला जावा.

या सर्व कारणांसाठी, धोरणनिर्मितीची प्रक्रिया आणि समाविष्ट मुद्दे या दोन्हींच्या आधारावर आम्ही सर्व स्त्री संघटना सध्याची महिला धोरण २०१० तयार करण्याची सदोष प्रक्रिया त्वरित थांबवावी आणि आमच्या वरील सूचना लक्षात घेतल्या जाव्यात अशी मागणी करत आहोत.

यासंबंधी १० ऑक्टोबर रोजी पुण्यामध्ये विविध संस्था संघटनांची बैठक झाली. त्यामध्ये असा निर्णय घेण्यात आला की महिला बाल विकास मंत्री श्री. सुभाष झनक यांची भेट घेण्यात यावी आणि त्यांच्याकडून सकारात्मक उत्तर न आल्यास २७ ऑक्टोबर रोजी मुंबईमध्ये आझाद मैदान येथे दु. १ वाजता धरणे धरावे. आपण सर्व संस्थांनी या संपूर्ण आंदोलनाला पाठिंबा देऊन धरण्यात सहभागी व्हावे ही विनंती.

आपल्या भागामध्येही महिला धोरणासंबंधी काही बैठका किंवा चर्चासत्रे होत असल्यास त्याची माहितीही तथापिला जरुर कळवा.

संपर्कासाठीः

किरण मोघे (९४२२३१७२१२), अलका पावनगडकर (९६८९९०७८३०), मेधा काळे, तथापि (०२० २४२६०२६४)

हमसफर

# समानतेच्या दिशेने... प्रकल्प अहवाल प्रकाशित

२००६ ते २००९ या काळात तथापिने चार सहभागी संस्थांच्या माध्यमातून समानतेच्या दिशेने - पुरुषांसोबत काम हा पथदर्शी प्रकल्प राबवला. समानता, लिंगभाव, स्त्रियांवरील हिंसा या सर्व विषयांवर अहमदनगर, सोलापूर आणि उस्मानाबाद या जिल्ह्यांमधील १२ गावे आणि सोलापूर शहरातील ४ वस्त्यांमधील निवडक पुरुष आणि युवकांसोबत संवाद साधत त्यांच्या साथीने समानता आणण्यासाठी काही कार्यक्रम सहभागी संस्थांनी हाती घेतले.

निवडलेल्या गाव-वस्त्यांमध्ये पुरुषत्वाविषयीच्या धारणा समजून घेणे आणि त्यातील घातक समज/धारणा दूर करणे; पुरुषत्वाची सकारात्मक समज वाढवणे यासोबतच स्त्रियांवरील हिंसा कमी करणे आणि सार्वजनिक ठिकाणं, संपत्ती याप्रत स्त्रियांची पोच वाढवणे अशी विविध उद्दिष्टं समोर ठेऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. समानता, पुरुषत्व, हिंसा, ताणतणाव अशा विविध विषयांवर युवक आणि पुरुषांसोबत संवाद साधण्यासाठी, त्यांना संघटित करण्यासाठी कोणत्या पद्धती, उपक्रम लागू पडतात हे तापसण्याचाही या प्रकल्पाचा उद्देश होता.

गाव-वस्त्यांतील गटांमध्ये, या प्रकल्पाचा गाभा असणाऱ्या युवक आणि पुरुषांमध्ये तसंच हा प्रकल्प राबवणाऱ्या सहभागी संस्थांच्या कार्यकर्त्यांमध्ये काय बदल घडून आले, काय अडचणी आल्या या सर्वांचा मागोवा घेणारा अहवाल तथापिने प्रकाशित केला आहे. यामध्ये प्रकल्पाच्या आढाव्यासोबतच पुरुषांसोबत काम या नव्याने बळावत असणाऱ्या दृष्टीकोनाबद्दल काही विवेचनही मांडण्यात आले आहे.

सध्या अनेक संस्था-संघटना मोठ्या कार्यक्रमांअतर्गत पुरुषांसोबत काम अथवा संवाद सरु करत आहेत. त्यांच्यासाठी हा अहवाल उपयोगी ठरेल. अहवाल मराठी व इंग्रजीत उपलब्ध आहे.


प्रकल्पातील सहभागी संस्था

अस्तित्व सामाजिक प्रबोधन संस्था, सांगोला, जि. सोलापूर

रचनात्मक संघर्ष समिती, शाखा नळदुर्ग, जि. उस्मानाबाद

राष्ट्रीय स्थायी विकास संस्था, संगमनेर, जि. अहमदनगर

समाजकार्य विभाग, वालचंद महाविद्यालय, सोलापूर




मराठवाड्यातील समाजिक कार्यकर्ते श्रीनिवास कुलकर्णी आणि जेष्ठ मराठी कवी, कामगार चळवळीचे खंदे नेते नारायण सुर्वे यांचं नुकतंच निधन झालं. त्या दोघांचं स्मरण म्हणून सुर्व्यांची एका कामगाराच्या मनातील भावना मांडणारी कविता वाचकांसाठी देत आहोत. सुर्व्यांच्या अनेक कवितांनी कामगारांच्या, दलित, शोषितांच्या जगण्याला शब्द दिले आणि त्यातला संघर्ष मांडला. ह्याच संघर्षातील कुलकर्णीसुद्धा एक शिपाई होते.

गलबलून जातो तेव्हा तुझ्याच पवित्र कुशीत शिरतो
तुझ्या मखमली कवेत स्वतःस अश्रूंसह झाकून घेतो

दिवसभर थकलेली तू तरीही चैत्रसावली होतेस
कढ उतू जाणाऱ्या दुधावर स्नेहमयी साय धरतेस

पदराने घाम टिपताना नजरेला नजर मिळते
माझ्या केसांवरुन तुझ्या पाचही बोटांचे अमृत झरते

किती वाळलात तुम्ही पुन्हा व्याकूळ नजर मलाच शोधते
एवढ्या एकाच वाक्याने माझ्या हृदयाचे पोलाद होते

भुऱ्या जावळाआड आपुला सोनुला चंद्र स्वप्नधुंद असतो
एकदा त्याचेवरुन पुन्हा माझ्यावरुन तुझा रेशमी हात फिरतो

जेव्हा तूच पाणावतेस तेव्हा छातीवरुन ढग सरकतो
माझ्या देहाची ढाल होते माझा हात तलवार होतो

बाहेर फटफटते, ओले किरण खोलीत फडफडतात
रथचक्रासारखे पुन्हा पाय कारखान्याकडे वळतात

*साभार: निवडक नारायण सुर्वे, लोकवाङ्मय गृह*

# बचत गटांचे 'निर्मल' सॅनिटरी पॅड

मासिक पाळीविषयी अजूनही मोकळेपणाने बोललं जात नाही. आणि त्याविषयीची काळजी, स्वच्छता या गोष्टीही पडद्याआडच राहतात. बाजारात उपलब्ध असणारे सॅनिटरी पॅडदेखील सगळ्या मुली आणि बायांपर्यंत पोचत नाहीत आणि बहुतेकींना ती परवडतही नाहीत. हे लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने एक राष्ट्रव्यापी योजना राबवण्याचं ठरवलं आहे. प्रारंभी देशातल्या काही निवडक राज्यात आणि त्यातल्याही काही निवडक जिल्ह्यात ही योजना सुरु करण्यात आली आहे.

या योजनेविषयी आणि महाराष्ट्रातल्या उपक्रमाविषयी थोडेसे.




ग्रामीण भागातल्या किशोरी मुलींसाठी अत्यल्प किमतीत सॅनिटरी नॅपकिन पुरवणं हे या योजनेचं उद्दिष्ट आहे. यासाठी १५० कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला आहे. केवळ एक रुपया किमतीत ६ नॅपक्न्सिचं एक पाकिट दारिद्रय रेषेखालील ग्रामीण मुलींना घरपोच किंवा शाळेत उपलब्ध करुन दिले जाईल.

महाराष्ट्रात नंदुरबार, धुळे, अकोला, उस्मानाबाद, बुलडाणा, लातूर, अमरावती, बीड, सातारा या नऊ जिल्ह्यांचा या योजनेत समावेश आहे. राज्यात दहा ठिकाणी बचत गटांनी सॅनिटरी नॅपकिन्स तयार करुन आसपासच्या परिसरात विकण्यास सुरुवात केली आहे. या नॅपकिनचं नाव आहे 'निर्मल'.

पाच पॅडच्या पाकिटाची किंमत आहे दहा रुपये. हे सारं काम महादेव जोगदंड पाहतात. ते सांगतात, महाराष्ट्रातील बहुतेक सर्व केंद्रांमध्ये दिवसाला साधारण दोनशे पाकिटं तयार केली जातात. उस्मानाबाद व सोलापूर येथील बचत गटांनी तयार केलेली पॅड्स राज्य सरकार विकत घेणार आहे. शासनाने दारिद्रय रेषेचा फरक न करता ५ रुपयात ते सर्व मुलींपर्यंत पोचवायला **हवे**त अशीही त्यांनी मागणी केली आहे.

**काही विवाद**

या योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात पॅड्स खरेदी करण्यात येणार, तेव्हा बाजारातील मोठमोठ्या कंपन्या यात उतरतील. पण यासाठी सरकारने बचत गट किंवा लघुउद्योगांकडूनच पॅड्स तयार करुन विकत घ्यावेत असाही पर्याय या विषयावर काम करणाऱ्या अनेकांनी सुचवला आहे. जास्तीत जास्त स्वस्तात आणि पर्यावरण पूरक पद्धतीने पॅड तयार करण्याबाबतही अनेक प्रयोग चालू आहेत.

पाळीमधे कापडाच्या घड्या वापरल्या किंवा पॅड वापरले तरी त्याबाबतची स्वच्छता आणि विल्हेवाट महत्त्वाची आहे. खोल खड्डा खणून किंवा जाळून पॅड नष्ट करता येतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर पॅडचा वापर सुरु केल्यास या बाबींची काळजी घेतलीच गेली पाहिजे.

सोलापूर तालुक्यात जेऊर इथे बचत गटाने निर्मल या ब्रॅण्डचे उत्पादन सुरु केले आहे. बचत गटांसाठी उत्पन्नाचा हा चांगला पर्याय आहे.

*(अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक -०२१८१२५३०२२)*


माहितीच्या जगात

## साद आरोग्याची ४ - प्रजननमार्गाचा फिस्टुला

प्रजनन मार्गाचा फिस्टुला म्हणजे योनिमार्गाच्या आणि गुदाशयाच्या किंवा मूत्राशयाच्या भिंतीमध्ये फट पडणे. अशी फट पडून त्या जागेतून शौचाचे किंवा लघवीचे कण बाहेर येत राहतात आणि योनिमार्गाला इजा व जंतुलागण होते.

या आजाराचं प्रमाण आता खूप कमी झालं असलं तरी जिथे बाळंतपणाच्या कुशल सुविधा उपलब्ध नाहीत, बाळंतपण अडलं तर सिझर शस्त्रक्रियेच्या सोयी नाहीत तिथे अजूनही बायांना हा आजार होण्याची शक्यता आहे. या आजाराची लक्षणं, कारणं तसंच प्रतिबंधक उपाय व शस्त्रक्रियेची माहिती देणारं साद आरोग्याची या माहितीपत्रकांच्या मालिकेतील चौथं माहिती पत्रक तथापिने प्रकाशित केलं आहे.

देणगी मूल्यः रु. १५ फक्त



# गर्भलिंग निदान करणाऱ्या डॉक्टरांना शिक्षा

२००१ साली झालेल्या जनगणनेने दाखवून दिलं की देशभरात आणि महाराष्ट्रात देखील दर हजार मुलग्यांमागे मुलींची संख्या कमी होत चालली आहे. मुलगा हवा हा हव्यास आणि गर्भलिंगनिदान करण्यासाठी सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा अनिर्बंध वापर यासाठी कारणीभूत आहे हे स्पष्ट आहे. गर्भधारणापूर्व आणि प्रसूतीपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायदा अस्तित्वात असूनदेखील गर्भलिंगनिदान होतच आहे. या कायद्याची कडक अंमलबजावणी झाली तर याला निश्चितच आळा बसेल.

महाराष्ट्रामध्ये गेल्या तीन महिन्यात दोन डॉक्टरांना कायद्याने गुन्हेगार सिद्ध करुन शिक्षा ठोठावली आहे. असे गुन्हे करणाऱ्या इतरांना यामुळे जरब बसेल हे निश्चित.

जळगाव जिल्ह्यातही असाच आशादायी निकाल लागला आहे. पारोळा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांनी पारोळ्याच्या डॉ. प्रशांत नवनीतलाल गुजराथी या डॉक्टरला गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायद्याच्या कलम २३ व २५ चा भंग केल्याबद्दल एक वर्ष सक्तमजुरी आणि ५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली. समुचित प्राधिकाऱ्यांनी कारवाई करुन न्यायालयात खटला दाखल केला होता. त्यावर जुलै महिन्यात हा निकाल देण्यात आला.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील डॉ. प्रभाकर पवार या डॉक्टरला गर्भलिंगनिदान तपासणी केल्याबद्दल प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी राजेश कापटे यांनी तीन वर्षाची सक्तमजुरी आणि ९०,००० रुपयांटचा दंड ठोठावला आहे. साताऱ्याच्या दलित महिला विकास मंडळाने ९ सप्टेंबर २००५ रोजी गरोदर बाईला पाठवून लिंगनिदानाची मागणी केली होती. या तपासणीसाठी डॉक्टरने संबंधित बाईकडून २५०० रुपये घेतले. तपासणी करत असताना जिल्हा शल्यचिकित्सक यादव यांनी छापा घालून त्याला रंगे हाथ पकडले होते. गर्भधारणापूर्व व प्रसूतीपूर्व गर्भलिंगनिदान प्रतिबंध कायद्याच्या १० विविध कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात आले होते. कोर्टात हा खटला ५ वर्षं चालला. अखेरीस, या सर्व गुन्ह्यांसाठी आरोपीला दोषी मानण्यात आले.

**PRINTED MATTER** बुक पोस्ट

प्रकाशक प्रति

**तथापि ट्रस्ट**
४२५ डी पी- ७७, टिमवि कॉलनी,
मुकुंद नगर, पुणे ४११०३७
दूरध्वनी : ०२० - २४२६०२६४; २४२६७९०८
Email: tathapi@tathapi.org
Website: www.tathapi.org

अंकातील प्रत्येक मताशी तथापि संस्था सहमत असेलच असे नाही. अंकाचा व संस्थेचा उल्लेख करून कोणालाही या अंकातील माहितीचा वापर करता येईल.

पारगावच्या पारावरुन चित्रः राजू देशपांडे

**जिव्हाळा देणगी वर्गणी: वार्षिक – रु. ३५, तीन वर्षासाठी – रु. १००** **खाजगी वितरणासाठी**